R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक **महावृत्त**

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ३९

दि. २० जानेवारी २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

# छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वधर्म, स्वदेश, स्वभाषेचा वसा घेऊन भारताच्या विकासात योगदान देऊया - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस






झ्युरिक, : 'छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला स्वधर्म, स्वदेश आणि स्वभाषा वसा घेऊन, भारताला विकासाच्या उत्तुंग वाटेवर घेऊन जाऊया, असे आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्वित्झर्लंड झ्युरीक येथील बृहन महाराष्ट्र मंडळाच्या स्वागताचा स्वीकार केला. येत्या काळात महाराष्ट्र भारतातील ट्रिलीयन डॉलर्स ईकॉनॉमीचे राज्य म्हणून उदयास येईल. त्यामुळे विदेशात राहणाऱ्या मराठी माणसाचा महाराष्ट्राचा अभिमान आणखी वृद्धिंगतच होईल, असा विश्र्वास व्यक्त करत, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या मराठी बांधवांचा विदेशातील महाराष्ट्राचे राजदूत असा गौरवाने उल्लेख केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे वर्ल्ड इकोनॉमिक फोरमसाठी आज झ्युरिक येथे आगमन झाले. पाच दिवसांच्या दौऱ्यासाठी येताच त्यांचे मराठमोळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. पारंपरिक वेश, पारंपरिक पद्धती आणि पारंपारिक उत्साहात मराठीजनांनी केलेल्या स्वागताबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे आभार मानले. महाराष्ट्राच्या राज्यगीताने झ्युरीकचे सभागृह दुमदूमून गेले.

**मराठी बांधवांचे कार्य महाराष्ट्राचा पासपोर्ट!**

ते म्हणाले की, पारंपरिक वेश, पारंपरिक पद्धती आणि पारंपरिक उत्साह या तीनही गोष्टी बघायला मिळाल्याने. एक प्रकारे आपण परदेशात राहणारी मंडळी, महाराष्ट्राचे आणि मराठीचे राजदूत आहात. महाराष्ट्राची संस्कृती, आपली भाषा याचा परिणाम आणि प्रभाव तयार करता. मराठी बांधवांनी जगभरात नाव कमावले आहे. आपल्याकडे पाहून, अनेक देशात मराठी माणसाला सन्मान मिळतो. कारण आपल्या देशातील मराठी लोकांनी चांगलं काम केले आहे. त्या-त्या देशाच्या संस्कृतीमध्ये, व्यवसाय, उद्योग-व्यवसायामध्ये जे-जे योगदान दिले आहे, त्यामुळे आम्हालाही सन्मान मिळतो. या देशातील उद्योगांनाही आपल्याला भारतात कुठे जायचे आहे, तर भारतात जायचे असे वाटते. कारण मराठी माणूस अतिथ्यशील, स्वागतशील आणि उद्यमशील आहे. मराठी माणूस मेहनती आहे. अशा पद्धतीने मराठी माणसाची प्रतिमा आपण निर्माण केली आहे. याच जोरावर यंदाही महाराष्ट्र दावोस मधील गुंतवणूक परिषदेत महाराष्ट्राचा बोलबोला राहील!

**महाएनआरआय कनेक्ट..!**

जगभरातील मराठी-भारतीय मंडळी इतक्या वेगवेगळ्या गोष्टी करत आहेत. त्यातील अनेक गोष्टी या अतिशय अर्थपूर्ण आणि अभिनव, परिवर्तनशील अशा आहेत. या सगळ्या गोष्टींचे अदान-प्रदान झाले पाहिजे. यासाठी बृहन्महाराष्ट्राशी म्हणजेच बृहद महाराष्ट्राशी संबंधित मराठी जन आहेत, त्यांचा कनेट जगातील अन्य मराठी बांधवाशी असला पाहिजे. त्यासाठी हे व्यासपीठ- प्लॅटफॉर्म महत्वपूर्ण ठरेल. कारण छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्याला स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांचा वसा-वारसा दिला आहे. या तीनही गोष्टींसाठी हा प्लॅटफॉर्म आपल्याला एकमेकांशी जोडेल. तो परस्परांतील संपर्क- समन्वय वाढविण्यासाठी सहाय्यभूत ठरेल. यातून आपल्या सर्वांसाठी समृध्दीचा नवीन मार्ग खुला होईल.

**सांस्कृतिक समृद्धी म्हणूनच महाराष्ट्र समृद्ध!**

मराठी भाषा अभिजात होती. पण तिला राज्यमान्यता मिळणे आवश्यक होते. ही राज्यमान्यता मिळवून देण्यासाठी आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष पुढाकार घेतल्याचे उल्लेख करून, मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आपण विदेशातील मराठी बांधव मराठी भाषेच्या संवर्धनाकरिता, मराठी भाषेच्या संपन्न-समृद्धीकरिता प्रय़त्न करत आहात, हे कौतुकास्पद आहे. भारताबाहेर आपण युरोपमध्ये मराठी शाळा चालवता. मुलांना मराठी भाषा शिकवता. भाषा या माध्यमामुळे आपण आपली संस्कृती, संस्कार, उत्सव, आपले साहित्य, कला यांच्याशी जोडलो जातो. भारतात महाराष्ट्र भौतिकदृष्ट्या समृद्ध, संपन्न तसेच सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध समजले जाते. महाराष्ट्राने केवळ भौतिक समृद्धी मिळविलेली नाही, तर तर सांस्कृतिक समृद्धी देखील मिळवलेली आहे. आपण सांस्कृतिक समृद्धी टिकवली म्हणूनच भौतिक दृष्ट्या समृद्ध ठरलो आहोत. यातूनच महाराष्ट्र हे येत्या तीन वर्षात भारतातील ट्रिलीयन डॉलर्सची अर्थव्यवस्था असणारे पहिले राज्य ठरेल, असा विश्र्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी महाराष्ट्र विदेशी थेट गुंतवणूक, स्टार्ट अपमध्ये, निर्यात, मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात प्रथम क्रमांकांचे राज्य आहे. देशातील साठ टक्के डाटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. एआय आणि संरक्षण क्षेत्रातील उत्पादनांतही महाराष्ट्र सर्वात पुढे असल्याचा उल्लेख केला.

**दरवर्षी बदललेली मुंबईप्रत्येक शहरात विकास!**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात पायाभूत सुविधांची निर्मिती झाली, त्यामध्ये सर्वाधिक आयकॉनिक इन्फ्रास्ट्रक्चर निर्मितीत महाराष्ट्र पुढे आहे असा उल्लेख करून ते म्हणाले, मुंबईचा कायापालट करतो आहोत. पुढच्या काळात अजून काही महत्वाकांक्षी बदल होणार आहेत. दरवर्षी आपण मराठी मुंबईत परत याल, त्या प्रत्येक वर्षी मुंबई बदलेली दिसेल. २०३० मध्ये जगातल्या विकसित राष्ट्राच्या राजधानीच्या शहराहून उत्तम मुंबई पुढच्या पाच वर्षात तयार झालेली दिसेल. मुंबईच नव्हे, तर हे परिवर्तन पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक आणि कोल्हापूरातही दिसेल. अतिशय चांगल्या पद्धतीने आपण विकासाचा वेग पकडला आहे. आता महाराष्ट्र थांबणार नाही, या ध्येयवाक्य प्रमाणेच महाराष्ट्र अतिशय वेगाने पुढे जाणार आहे. यात विदेशात राहणाऱ्या मराठी बांधवांचेही महत्वाचे योगदान राहणार आहे.

स्वित्झर्लंडमधील भारताचे राजदूत मृदुलकुमार यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे स्वागत केले. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी आणि किंजारापू राम मोहन नायडू यांनीही भेट घेत मुख्यमंत्र्यांचे महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून झालेल्या कार्यक्रमात 'स्वागत देवाभाऊ' असे फलक झळकले. आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचे समन्वयक अमोल सावरकर यांनी आज झ्युरिक येथे मराठी मंचाने स्वित्झर्लंडमधील विविध शाळांमध्ये मराठी भाषेचा वर्ग सुरू करण्याचा उपक्रम हाती घेतल्याचे सांगितले.

## प्रभाग क्रमांक १ : पराभवातही विजयाचा ठसा - काँग्रेसचे शिल्पकार ठरले ॲड. गोपाळ बुरबुरे




लातूर :- लातूर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमाक १ मधील निकालाने एक गोष्ट ठळकपणे समोर आली आहे-काँग्रेसचा खरा कर्णधार म्हणजे ॲड. गोपाळ बुरबुरे. स्वतः निवडणूक न जिंकता देखील तीन उमेदवारांना विजयी करून दाखवणे, ही त्यांच्या नेतृत्वक्षमता, संघटन कौशल्य आणि राजकीय दूरदृष्टीची ठोस पावती मानली जात आहे.

या संपूर्ण प्रभागातील निवडणूक रणनीती, प्रचाराची दिशा, बूथ मॅनेजमेंट आणि उमेदवारांचे मनोबल या सगळ्याची सूत्रे ॲड. गोपाळ बुरबुरे यांच्याच हाती होती. त्यांनी ओपन पुरुष प्रवर्गातून स्वतः अत्यंत ताकदीची लढत दिली. भाजपाचे माजी शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांना त्यांनी शेवटपर्यंत कडवी झुंज दिली. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे मुस्लिम समाजाचे उमेदवार शेख इर्शाद यांना मिळालेल्या ३७३४ मतांमुळे मतविभाजन झाले आणि त्याचा फटका बुरबुरे यांना बसला. या परिस्थितीत देविदास काळे यांचा विजय झाला.तरीही हा पराभव वैयक्तिक असून संघटनात्मक विजय मात्र बुरबुरेंचाच आहे, असे मत राजकीय विश्र्लेषक व्यक्त करत आहेत. बुरबुरेंच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचा दणदणीत विजयॲड. गोपाळ बुरबुरे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने प्रभाग क्रमाक १ मध्ये तीन जागावर निर्णायक विजय मिळवला: अनुसूचित जाती 'अ' प्रवर्गातून काँग्रेसचे ॲड. मनोज थोरात यांनी भाजपाचे पंकज शिंदे यांचा तब्बल १८९१ मतांनी सहज पराभव केला.नागरिकांचा प्रवर्ग (महिला) 'ब' मधून काँग्रेसच्या चंद्रकला मदने यांनी भाजपाच्या ज्योती तिवारी यांचा १३४५ मतांनी पराभव केला. ओपन महिला प्रवर्गात काँग्रेसच्या शेख तबसूम यांनी भाजपाच्या शेख समीना यांचा ७०९ मतांनी पराभव करत विजय संपादन केला.




पराभवातही नेता मोठा ठरतो तेव्हा राजकीय जाणकारांच्या मते, स्वतः पराभूत होऊनही तीन उमेदवार निवडून आणणे, हे केवळ सामान्य नेत्याला शक्य नसते. ॲड. गोपाळ बुरबुरे यांनी या निकालातून हे सिद्ध केले आहे की, ते केवळ उमेदवार नाहीत, तर संघटना उभारणारे प्रभावी नेतृत्व आहेत.

प्रभाग क्रमांक १ चा निकाल काँग्रेससाठी संमिश्र असला, तरी नेतृत्वाच्या कसोटीवर ॲड. गोपाळ बुरबुरे पूर्णपणे यशस्वी ठरले आहेत. आगामी महापालिका राजकारणात त्यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार, हे या निकालाने स्पष्ट संकेत दिले आहेत.



# पानगाव जिप गटातून ऋषिकेश कराड यांची उमेदवारी घोषित;जिल्हयात सर्वाधिक मताधिक्याने विजयी करा - आ. कराड






लातूर - केंद्रात आणि राज्यात भाजपाच्या नेतृत्वातील सरकार असल्याने ग्रामीण भागातील विकासाला गती देण्यासाठी गोरगरीब, सर्व सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीतही भाजपाचीच सत्ता येणे गरजेचे आहे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले. विविध गावातून आलेल्या मागणीनुसार पानगाव जिल्हा परिषद गटातून ऋषिकेश कराड यांची तर पानगाव पंस गणातून रंजना मारुती गालफाडे आणि कोष्टगाव पंस गणातून जयश्री संजय डोंगरे यांची उमेदवारी घोषित करून जिल्ह्यात सर्वाधिक मताधिक्याने विजय झाला पाहिजे असे बोलून दाखवले.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने पानगाव जिल्हा परिषद मतदार संघाचा विजय संकल्प मेळावा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी पानगाव येथे झाला मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव अनाने मामा हे होते तर या प्रसंगी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, सुकेश भंडारे, अनंत चव्हाण, सतीश आंबेकर, हरीकृष्ण गुर्ले, दिगंबर येडले, अमर चव्हाण, उत्तरेश्वर हेरकर, धोंडीराम हलकुडे, श्रीकृष्ण जाधव, सरपंच मीनाताई मोटाडे, उपसरपंच प्रेमलता वाघमारे, ललिता कांबळे, सुंदर घुले, भागवत गीते, ज्ञानोबा गुडे, भास्कर लहाने, प्रकाश केदार, माधव घुले, राजेंद्र गोरे, अशोक राठोड, वैजनाथ लहाने, राहुल मोटाडे, शिला आचार्य यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी आ. कराड यांचे पानगाव नगरीत आगमन होताच मोठ्या उत्साहाच्या ढोल ताशाच्या गजरात फटाक्याची आतिषबाजी करत जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी भाजपाच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. मेळाव्याच्या प्रारंभी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, रेणापूर तालुका भाजपाचा बालेकिल्ला आहे या तालुक्याने लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे नेतृत्व उभे केले. मुंडे साहेबांनी रेणापूरची ओळख देशात केली. रेणापूर पानगाव भागाला न्याय देण्याचे आणि खरा विकास काय असतो हे त्यांनी दाखवून दिले. त्यानंतर काँग्रेसवाल्यांनी या भागाला विकासापासून वंचित ठेवले. विधानसभा निवडणुकीत भाजपचा विजय झाल्याने मुंडे साहेबानंतर रेणापूर पानगाव भागात अनेक गावागावातील विकासाला गती देण्याचे आणि मोठ्या प्रमाणात निधी मिळून देण्याचे भाग्य मला मिळाले असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या जन्मदिना निमित्ताने राज्यातील ७३ मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचा निर्णय झाला त्यात पानगावच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा समावेश करून या कामाकरिता १४ कोटी रुपयांचा निधी मिळवून देण्यात मला यश मिळाले मात्र त्यातही काहीजण राजकारण करत आहेत हे दुर्दैवी असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, बस स्थानक नूतनीकरणसह ग्रामीण रुग्णालय, पशुवैद्यकीय दवाखाना शासनाच्या मंजुरी स्तरावर असून पानगाव येथील शादीखाना वर्षभरात पूर्ण करून देण्याची ग्वाही दिली. पानगावकरांनी जे जे मागितले ते ते आजपर्यंत देण्याचा प्रयत्न केला आहे. रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या चार आणि पंचायत समितीच्या आठही जागेवर भाजपाचा विजयी करण्याचा आणि पानगावची जागा जिल्ह्यात सर्वाधिक मताधिक्याने विजयी करण्याचा संकल्प सर्वांनी करावा असे बोलून दाखविले.

यावेळी बोलताना माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे म्हणाले की, सत्तेचे पाठबळ असल्याशिवाय विकासाला गती मिळत नाही. काँग्रेसवाले भूलथापा देऊन संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करतील त्यांच्यापासून सावध राहावे. केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता असल्याने जिल्हा परिषद पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात आली पाहिजे आ. रमेशआप्पा कराड यांच्या विकास कामांना साथ देऊन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे ताकद उभी करावी असे बोलून दाखवले.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांची रेणापूर पानगाव ही कर्मभूमी आहे या भूमीला नमन करून यावेळी बोलताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, मुंडे साहेबांनंतर रमेशआप्पांनीच या भागाच्या विकासाला गती देण्याचे काम केले आहे. पानगाव रस्त्याच्या माध्यमातून जनतेला कोणी वेठीस धरले, विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या आडून कोण राजकारण करतायत याची जाणीव जनतेला असून स्वतःची पोळी भाजून घेण्यासाठी प्रत्येक निवडणुकीत वेगवेगळे फंडे करणाऱ्या पासून सावध राहावे. जनतेची सेवा करण्यासाठी आम्हाला सत्ता हवी आहे तेंव्हा आपण निश्चितपणे भाजपाच्या पाठीशी मतदानरुपी आशीर्वाद द्यावेत असे आवाहन केले.

यावेळी श्रीकिशन जाधव, आयुब मणियार, ललिता कांबळे यांनी मनोगत व्यक्त करून पानगाव मतदार संघातून ऋषिकेश कराड यांना उमेदवारी देण्याची मागणी केली प्रारंभी माजी सरपंच सुकेश भंडारे यांनी आ. रमेशआप्पांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामाचा आढावा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी सतीश आंबेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या मेळाव्यास सतीश कुलकर्णी, सुधाकर बोराडे, वैजनाथ लहाने, राम भताने, संपत कराड, भूषण संपत्ते, निवृत्ती लहाने, रफिक पठाण, बंडू केंद्रे, मारुती गालफाडे, बाबुराव कस्तुरे, धर्मराज बोराडे, शिवाजी जाधव, बालाजी केंद्रे, प्रकाश गालफाडे, भास्कर कांदे, इस्माईल मनियार, दत्ता मुंडे, संजय केदार, लक्ष्मण खलंग्रे, विलास नागरगोजे, प्रल्हाद पोटे, त्र्यंबक भताने, बसवराज गुरफळे, नाथराव गीते, ज्ञानेश्वर शेंडगे, उमाकांत मोटाडे, अक्षय चव्हाण, खदीर अत्तार, कार्तिक गंभीरे, अविनाश मोटाडे, दत्ता आंबेकर, बाबासाहेब केंद्रे, जब्बार शेख, विठ्ठल डोंगरे, आयुब मणियार, जयराम कस्तुरे, गोविंद नरहरे, रमाकांत वाघमारे, विष्णू केंद्रे, रोहित भंडारे, सुरज मोटाडे, प्रवीण संपत्ते, नितीन फुले, रामेश्वर कस्पटे, माधव हरिदास, ऋषिकेश हरिदास, विलास केदार, अभय वैष्णव, विशाल कलवले, वैभव रोकडे, निखिल शेरखाने, शुभम पुरी, हेमंत गोरे यांच्यासह पानगाव गावातील त्याचबरोबर जिल्हा परिषद मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते लोकप्रतिनिधी आणि मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री गुरुकुल स्कॉलर्स प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलचे १० वे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न




लातूर : येथील सिग्नल कॅम्प भागातील श्री गुरुकुल स्कॉलर्स प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलचे २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात व थाटामाटात साजरे करण्यात आले.

श्री गुरुकुल स्कॉलर्स प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल ची वाटचाल अतिशय चांगल्या पद्धतीने चालू असुन या स्कूल ने यावर्षी १० व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. या स्कूल तर्फे वर्षभरात वेगवेगळे सार्वजनिक उपक्रम राबविण्यात येतात. त्यात विशेष म्हणजे शाळेतील मुलांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षाचे रोप भेटवस्तू म्हणून दिले जाते, तसेच त्या रोपाचे संगोपन व त्याबद्दल चे महत्व ही मुलांना व त्यांच्या कुटुंबाला सांगण्यात येते.

यावर्षी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे लातूर मधील सुप्रसिद्ध वकील ड.बालाजी पांचाळ, सुप्रसिद्ध बांधकाम डेव्हलपर इंजि.अतुल कदम यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी संस्थेचे अध्यक्ष ड.किरण बडे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचे स्वागतही झाडांची रोपटे देऊन करण्यात आले. यावेळी २०२५-२६ मधील बेस्ट स्टुडंट ऑफ द इयर हे पुरस्कारही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आले. सदरील पुरस्कार श्लोक आचार्य, अमय वाडीवाले, आराध्या उपाळे व तन्वी स्वामी या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आले. यावेळी स्कूल मधील या लहान चिमुकल्यांनी आपल्या सुंदर नृत्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. प्रिया किरण बडे यांनी केले, सूत्रसंचालन श्री. शिवपुत्र स्वामी सर यांनी केले, मुलांचे नृत्याविष्कार श्री.रमेश भिसे सर यांनी अतिशय सुंदर रित्या घडवून आणले, तर आभार प्रदर्शन श्रीजनी मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला स्कूलचे शिक्षक वर्ग, कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच शाळेच्या १० वर्ष स्थापनेपासूनचा पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या युवक शिबीराचे उद्घाटन संपन्न

मुरुड/ महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष युवक शिबीर मौजे गोंदेगाव येथे दि. १८ जानेवारी २०२६ ते २४ जानेवारी २०२६ दरम्यान संपन्न होत आहे. या शिबीराचा उद्घाटन समारंभ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोंदेगाव येथे संपन्न झाला. या उद्घाटन समारंभ प्रसंगी मा. सौ. तनुजा पांडुरंग देशमुख (सरपंच, ग्रामपंचायत गोंदेगाव) यांचे प्रतिनिधी मा. पांडुरंग देशमुख अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. उद्घाटक आणि प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. हरिदास फेरे (प्राचार्य, कै. वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी) उपस्थित होते तर समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. बी. एस. (दादा) पटाडे, समाज जागृती शिक्षण संस्थेचे संचालक मा. फुलचंदजी हिंगले, संभाजी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. अशोक काळम, मा. शरणाप्पा स्वामी, मा. अमोल देडे, मा. सोमनाथ बलसुरकर, मुख्याध्यापिका मा. ललिता खरटमोल, मा. अशोक सोनवणे, मा. विश्वनाथ खैरे, मा. कृष्णा पटाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.




कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलतात डॉ हरिदास फेरे म्हणाले की, आजचे विद्यार्थी हे राष्ट्राचे चरित्र घडविणारे निर्माते होणे आवश्यक आहे. शिक्षणासोबतच चारित्र्य महत्वाचे आहे. म्हणून आजच्या विद्यार्थ्यांनी चारित्र्यवान व्हावे. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर विचारांना कृतीची जोड द्यावी. पुढे बोलताना ते म्हणाले की, जोपर्यंत शिकणार नाहीत तोपर्यंत शिक्षणाचे महत्त्व आपणास कळणार नाही. म.गांधी यांनी श्रमाचे मूल्य सांगितले आहे. ते श्रमाचे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजणे काळाची गरज आहे. गरिबीचे दुसरे नाव अज्ञान आहे तर श्रीमंतीचे दुसरे नाव शिक्षण आहे. आणि म्हणून उच्चशिक्षण घ्या आणि मोठे व्हा. जगाच्या विकासाचे सूत्र महात्मा फुले यांच्या अखंडात आहे म्हणून अज्ञानी राहू नका.

प्रमुख उपस्थिती असलेले समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. बी. एस.(दादा) पटाडे म्हणाले की, महात्मा गांधी, गाडगेबाबा, बाबासाहेब परांजपे यांनी खेड्यापाड्यातून जागृती केली आणि लोकांचा विकास घडवून आणला. जीवनात सुखी व्हायचे असेल तर शिकावे लागेल. आजच्या स्पर्धा परीक्षेच्या युगात विद्यार्थ्यांनी दक्ष राहणे गरजेचे आहे. तसेच या युवक शिबिराचा उपयोग विद्यार्थ्यांनी जीवनात करून घेणे आवश्यक आहे. प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले यावेळी ते म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी हे शिबीर आहे. आजच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच विविध कौशल्ये आत्मसात करावीत तरच ते आधुनिक काळात टिकू शकतील. यावेळी 'शिक बाबा शिक लढायला शिक कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक' ही कविता सादर करून मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. एन. एल. पैठणकर यांनी केले. यावेळी त्यांनी शिबीर आयोजित करण्याचा उद्देश व शिबिरातील संकल्प सांगितले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी कु. तब्बु पठाण हीने केले तर आभार सहकार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मीना कदम यांनी मानले. कार्यक्रमास सहकार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी. एम. गोरे, प्रा. डॉ. रणदिवे डी.एम., प्रा. मधुकर क्षीरसागर, प्रा. बालने के. एच. यांच्यासह जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समाजभूषण उत्तमराव तरकसे भूतान देशाच्या दौऱ्यावर





मुंबई :- भूतान देशातील सामाजिक,सांस्कृतिक, धार्मिक,राजकीय व कृषी विषयाचे सखोल अवलोकन करण्याकरिता समाजभूषण मा. श्री. उत्तमराव दासु तरकसे असरडोहकर (महाराष्ट्र राज्य शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक व विचारवंत) हे भूतान देशाच्या दहा दिवसाच्या दौऱ्यावर असताना मोंगार जिल्ह्यातील भारतीय वंशज असलेल्या एका सर्वसामान्य कुटुंबातील श्री दुलाल कलिता श्री धीरज कलिता श्री बिपिन कलिता रमण कलिता सर्व सामान्य भारतीय वंशज असलेल्या कलिता परिवारातील वस्तीवर राहून भूतान देशातील सामाजिक सांस्कृतिक धार्मिक राजकीय व कृषी विषयावरचे अवलोकन करण्याकरिता भूतान देशाची राजधानी थिंफु, जिल्ह्यातून सुरुवात करत वेंगटेंव्ह पोंडशंग, ट्रॉंग्सा,झेमगंग, पेमा, मोंगार ट्रॉशिंगग अशा जिल्ह्यातून सदर विषयाचे अवलोकन करत समूप जोंगखार जिल्ह्यातील भूतान व भारत देशाच्या सीमा प्रवेशद्वारातून परतिचा प्रवेश आपल्या मायभुमित भारत देशात करत आसाम राज्यातील गोलपारा जिल्ह्यातून गुहाटी येथील आंतरराष्ट्रीय हवाई अड्ड्यावरून विमानाने मुंबई सांताक्रुज छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय हवाई अड्ड्यावर दहा दिवसानी सदर विषयावरील सखोल अवलोकन करून परतले. भूतान देशातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक,राजकीय व कृषी विषयाचे समाजभूषण मा श्री तरकसे यांनी केलेल्या सखोल अवलोकनाचा आपल्या देशाला, राज्याला, व समाजाला निश्चितच त्याचा पुढे फायदा होईल यात तिळमात्र शंका नाही

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो विशेष वार्षिक युवक शिबिराचे उत्साहात उद्घघाटन




लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष वार्षिक युवक शिबिराचे उद्घाटन मौजे दावतपूर,ता. औसा,जि.लातूर येथे दि.१८ जानेवारी २०२६ रोजी झाले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी संचालक डॉ.शिवराज बोकडे यांनी उपस्थिती दर्शविली.याप्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.अमोल ठोसर व डॉ.सुरज कोल्हे,उपसरपंच विठ्ठल बेडजवळगे तसेच ग्रामस्थ सिद्धेश्वर बेटकर,मधुकर लांडगे,राहुल पाटील व केरप्पा बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख पाहुणे रासेयो माजी संचालक डॉ. शिवराज बोकडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे सविस्तरपणे समजावून सांगितली. नॉट मी,बट यू या ब्रीदवाक्याचा खरा अर्थ स्पष्ट करताना त्यांनी एनएसएस ही केवळ एक योजना नसून समाजपरिवर्तनाची चळवळ असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच समाजातील गरजू घटकांसाठी काम करावे, समाजसेवेला जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा तसेच जलसंधारण,स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडते व जबाबदार नागरिक तयार होतात,असे त्यांनी सांगून स्वयंसेवकांना समाजसेवेसाठी प्रोत्साहित केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी सदर शिबिराचे मुख्य उद्दिष्ट शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास

हे असून युवकांच्या सक्रिय सहभागातून जलसंधारण, मृद्संवर्धन, वृक्षारोपण व ओसाड भूमी विकास साधणे हा या शिबिरामागील प्रमुख हेतू आहे.राष्ट्रीय सेवा योजना ही समाजपरिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे.युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी, सेवाभाव व नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिक्षणाबरोबरच सामाजिक जाणीव निर्माण होणे गरजेचे असून,अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो,असेही त्यांनी सांगितले.

यावेळी उपसरपंच विठ्ठल बेडजवळगे व ग्रामस्थ सिद्धेश्वर बेटकर यांनी आपल्या भाषणातून गावाच्या सर्वांगीण विकासावर भर दिला.ग्रामविकासासाठी युवकांचा सहभाग, जलसंधारणाची आवश्यकता, स्वच्छता, वृक्षारोपण व सामाजिक एकोपा याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले तसेच एनएसएस स्वयंसेवकांच्या कार्याचेही कौतुक केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.अमोल ठोसर यांनी शिबिराची उद्दिष्टे व शिबिरादरम्यान राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमांची माहिती दिली तर आभार प्रदर्शन डॉ.दीप्ती ढेरे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी माने व तृप्ती बिराजदार यांनी केले.या उद्घाटन कार्यक्रमास रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे,डॉ.राहुल मोरे,डॉ. विजेंद्र चौधरी,प्रा.शिलेश गावित व प्रा.मेघा आत्राम यांच्यासह महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ग्रामस्थ यांची उपस्थिती लाभली.शिबिराच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून ग्रामीण विकासाला चालना देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

# श्री मातापुरी देवीच्या जागेवर अनेकांचा बेकायदेशीर बांधकाम सहित कब्जा



लातूर : निलंगा तालुक्यातील निटूर गावात निजाम कालीन मंदिर अस्तित्वात आहे. अशी अनेक मंदिरे आजही लातूर जिल्ह्यात आहेत. लातूर, उदगीर, औसा, निलंगा व इतर ठिकाणी पहावयास मिळते. पण निटूर गावात असलेले प्राचीन श्री मातापुरी देवीचे मंदिर व सभोवतालची जागा इनामी म्हणून आज ही शासन दरबारी अधिकृत नोंद आहे. याच श्री मातापुरी देवीच्या जागेवर तेथील गावकऱ्यांनी मंदिराची जागाच हडप केल्याने निटूर सह निलंग्यात एकच खळबळ उडाली आहे.

लातूर पासून जवळच असलेल्या लातूर निलंगा यांना जोडणारे गाव म्हणजे निटूर होय. याच गावात प्राचीन मंदिर म्हणून श्री मातापुरी देवीचे मंदिर आहे. २५ ते ३० वर्षांपूर्वी या मंदिरातील मातेची पूजा - अर्चा, धार्मिक कार्यक्रम इथे होत असे. तसेच भाविक भक्तांना दर्शन घेता यावे म्हणून मंदिराचे दारे उघडे असायचे. दररोज या ठिकाणी पूजा- अर्चा होत असे. सन १९७५ च्या दरम्यान सूर्यकांत गोविंदराव देशमुख रा. निटूर यांनी इनामी असलेली मंदिराची जागा बेकायदेशीर खरेदी केली. व सदरील जागेवर अनधिकृत बांधकाम बांधकाम करून बेकायदेशीर रित्या कब्जाही केला. पण अशा इनामी जागा खरेदी किंवा विक्री करता येते का ? याचा मात्र घोळ काही समजेना. मग खरेदी केली असेल तर कोणत्या कागदपत्रा आधारे, आणि जर विक्री केली असेल तर कोणत्या कागदपत्राच्या आधारे केली याचीही सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. मंदिराच्या जागेचीच बेकायदेशीर प्लॉट पाडून तेथील लोकांना विक्री केल्याचे उघड झाले आहे. निटूर येथील दिगंबर नरसिंगराव सोमवंशी, चंद्रकांत दत्तोपंत कुलकर्णी, सूर्यकांत गोविंदराव कुलकर्णी, अनुसयाबाई नारायण हजारे यांनी बेकायदेशीर रित्या मंदिर परिसरातील जागेवर अतिक्रमण करून बेकायदेशीर बांधकाम करून कब्जाही केला. कब्जाही केला. सदर याविरुद्ध निलंगा तहसील, जिल्हाधिकारी यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल केली असता अद्याप पर्यंत तरी कोणताही निर्णय घेण्यात आला नाही का? मग यांना लातूर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी निलंगा, महसूल मंडळाचे अभय आहे का? अतिक्रमण धारकांना कोण पाठीशी घालते का? निलंगा मंडळातील निटूरचे तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक यांची या प्रकरणात संगणमत आहे का ? अशी शंका उपस्थित होत आहे.

मंदिरातील जागेवर अतिक्रमण झाल्यामुळे मंदिरास जाण्यास फक्त पाच फुटाचा रस्ता ठेवल्याने मंदिर व परिसर अतिक्रमणधारकांच्या विळख्यात सापडले की काय अशी तीव्र भावना आता गावकऱ्यातून उमटत आहे.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक

लातूर, (जिमाका) : राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या माध्यमातून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे.

राज्य शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित तथा प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यू ट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, सार्वजनिक ठिकाणचे दृकश्राव्य फलक (ऑडीओ व्हिज्युअल डिसप्ले), ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस, समाजमाध्यमे, संकेतस्थळे आदींचा समावेश होतो.

निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती स्थापण्यात आली आहे. समितीत पोलिस अधीक्षक किंवा त्यांचे प्रतिनिधी, अपर जिल्हाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसीलदार हे सदस्य, तर जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव आहेत.

प्रस्तावित जाहिरात प्रसारित तथा प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्व प्रमाणनासाठी अर्ज करावा लागेल. पूर्व प्रमाणनाच्या अर्जासमवेत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत आणि राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अर्जाचा विहित नमुना महाराष्ट्र शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेसोबत दिलेला आहे.

# लातूर तहसील कार्यालयात उमेदवारांच्या मदतीसाठी कक्ष स्थापन

लातूर, : जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने लातूर तालुक्यातील निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी निवडणूक संबंधित नोडल अधिकारी यांची बैठक घेतली. या बैठकीत नामनिर्देशन पत्र स्वीकारणी, माघार, आचारसंहिता अंमलबजावणी, पथके स्थापना आदी बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासाठी दोनच दिवस शिल्लक असून नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी येणाऱ्या व्यक्तिंसाठी मदत कक्ष स्थापन करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. लातूर तालुक्यातील सर्व उमेदवारांनी वेळेत नामनिर्देशन पत्र सादर करावे व आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती नऱ्हे-विरोळे यांनी केले.



बैठकीस सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी श्याम गोडभरले, नायब तहसीलदार गणेश सरोदे, नायब तहसीलदार सुधीर देशमुख तसेच तहसील कार्यालय व निवडणूक नियुक्त अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेली निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याची प्रक्रिया २१ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी ११ ते ३ या कालावधीत चालणार आहे. नामनिर्देशन पत्र माघार घेण्याचा कालावधी २३ ते २७ जानेवारी २०२६ पर्यंत असून, वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ राहील. मात्र, २५ व २६ जानेवारी रोजी सुट्ट्या असल्याने त्या दिवशी माघार प्रक्रिया होणार नाही.

१९ जानेवारी २०२६ पर्यंत १३२ व्यक्तींनी १८३ फॉर्म खरेदी केले आहेत. नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यास दोनच दिवसांचा कालावधी शिल्लक असून नामनिर्देशन पत्रांच्या प्राथमिक तपासणीसाठी तहसील कार्यालयात १० पथके स्थापन करण्यात आली असून, उमेदवारांना आवश्यक मदत पुरविण्यासाठी मदत कक्ष देखील उभारण्यात आला आहे. उमेदवारांसाठी आसन व्यवस्था करण्यात आली असून, त्यांना फॉर्म भरण्यात मदत मिळेल.

आचारसंहिता अंमलबजावणीसाठी विविध पथके कार्यरत आहेत. यामध्ये स्थिर पथके पेठ, ममदापूर, मुरुड व महापूर या ठिकाणी कार्यान्वित राहतील. तसेच भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांचे प्रमुख म्हणून गट विकास अधिकारी श्याम गोडभरले काम पाहतील. लातूर तालुक्यातील उमेदवारांना विविध परवाने देण्यासाठी लातूर पंचायत समिती कार्यालयात एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात आला असून, उमेदवारांना आवश्यक परवाने (वाहन, बॅनर इत्यादी) येथून उपलब्ध करून दिले जातील. या कक्षाचे प्रमुख तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड राहतील. निवडणूक कामांसाठी मनुष्यबळ व्यवस्थापन कक्ष, खर्च पथक, मतदान जनजागृती कक्ष इत्यादी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर,(जिमाका) : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २० जानेवारी, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ०३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यावर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.